# इये वेदांताचिये नगरी

**श्री. चंद्रशेखर मुद्‌गल**

### महाशिवरात्र

माघ वद्य चतुर्दशीला म्हणजेच शुक्रवार दिनांक १२ फेब्रुवारी २०१० रोजी देवस्थानात इक्षुरसाच्या अभिषेकाने व चारयाम पूजेने महाशिवरात्र साजरी झाली. महाशिवरात्रीच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता चंद्रमौलेश्वरावर १०८ लिटर इक्षुरसाने रुद्राभिषेक करण्यात आला. यानंतर सायंकाळची नित्याची आरती होऊन उपस्थितांना प्रसाद म्हणून उसाच्या रसाचे वाटप करण्यात आले.

चारयाम पूजेस रात्री ८ वाजता प्रारंभ झाला. रात्री ८ ते पहाटे ५ पर्यंत चंद्रमौलेश्वरावर पाण्याच्या संतत धारेने रुद्राभिषेक करून षोडशोपचारे पूजा करण्यात आली. या पूजेचा कालावधी रात्रीचे चार प्रहर पार करतो म्हणून या पूजेला 'चारयाम' पूजा म्हणतात.

### श्रीरामकृष्णस्वामी जयंती

फाल्गुन शुद्ध तृतीयेला देवस्थानात प. पू. सद्‌गुरूंची ७६ वी जयंती साजरी करण्यात आला. या जयंती उत्सवाचे स्वरूप हे वैदिक अनुष्ठान, पाद्यपूजा, भक्तांचे मनोगत, गायन-वादन सेवा आणि पालखी सोहोळा अशा पद्धतीचे असते.

प. पू. गुरुदेवांच्या जयंतीच्या निमित्ताने १४ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी २०१० पर्यंत 'पंचायतन यागाचे' आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १७ फेब्रुवारी २०१० रोजी पहाटे महन्मंगल महापूजेने जयंतीच्या कार्यक्रमास सुरुवात झाली.

पहाटे महापूजेच्या वेळी भगवान श्री दत्तात्रेयांच्या मूर्तीला पवमानसूक्त व रुद्रघोषांच्या आवर्तनासह १०८ लिटर दुधाचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर प. पू. गुरुदेवांच्या सुवर्णपादुकांवर रुद्राभिषेक करून षोडशोपचारे पूजा करण्यात आली. सकाळी ७ वाजता आरती होऊन देवस्थान दर्शनासाठी खुले करण्यात आले. गुरुदेवांनी घालून दिलेल्या शिस्तीप्रमाणे भक्तांनी शिस्तबद्धरीत्या रांगेतून दर्शन घेतले.

प. पू. गुरुदेवांच्या पाद्यपूजेसाठी उभारलेल्या मंडपात भक्तांनी सकाळी ९ वाजल्यापासून गर्दी करण्यास सुरुवात केली. पंचायतन यागाची पूर्णाहुती झाल्यानंतर ठीक ९.३० वाजता विविधरंगी, आकर्षक व सुवासिक फुलांनी सजवलेल्या मंचावर बिरुदावलीच्या व वेदमंत्रोच्चाराच्या घोषात प. पू. सद्‌गुरूंच्या प्रतिमेची स्थापना करण्यात आली. प. पू. सद्‌गुरूंना साष्टांग नमस्कार करून कार्यक्रमास सुरुवात झाली. सुरुवातीला उत्सव समितीचे प्रमुख श्री. सुरेश गांधी यांनी प्रास्ताविक भाषण केले. ते म्हणाले की, ''आजचा दिवस आपल्यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. सर्व सत्संग मंडळांतर्फे आपण गुरुचरणांची पूजा करीत आहोत. ही सेवा सद्‌गुरूंनी आनंदाने स्वीकारावी अशी प्रार्थना करून सद्‌गुरूंना साष्टांग दंडवत घालतो. तसेच अशाच प्रकारे आमच्या सर्वांकडून उत्तरोत्तर अधिकाधिक सेवा घडावी, देवस्थानावर येणारी संकटे, येणारे अडथळे कायमस्वरूपी दूर व्हावेत व आपल्या सर्वांवर त्यांची कृपादृष्टी असावी.''

सर्व सत्संग मंडळांच्या वतीने राहुरी कृषिविद्यापीठ व नगर महिला सत्संग मंडळाने प्रतिनिधित्व केले. राहुरी सत्संगाचे अध्यक्ष श्री. घोरपडे व नगर महिला सत्संगाच्या अध्यक्षा सौ. रजनी त्र्यंबक वैकर यांनी पाद्यपूजा केली. पूजेनंतर सर्व विश्वस्तांनी आणि प्रत्येक सत्संग मंडळाच्या अध्यक्षांनी गुरुपादुकांवर मोठ्या भक्तिभावाने पुष्पहार व सेवा अर्पण करून आपला भाव व्यक्त केला.

पाद्यपूजनानंतर श्री. वत्सराज (पनवेल), श्री. विलास देशपांडे (नगर) व सौ. सुनंदा कुलकर्णी (पुणे) यांनी सद्‌गुरुमहिमा व्यक्त करणारी शब्दसुमने अर्पण केली. श्री. वत्सराज यांनी गुरूंचे आध्यात्मिक व लौकिक जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व विषद करताना श्री गुरुचरित्रातील व पुराणातील दाखले सोदाहरण दिले. तसेच आपल्या सद्‌गुरूंचे पूर्णत्व ओळखण्यास आपल्याला अनेक जन्म लागतील, असे

सांगितले. श्री. विलास देशपांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, ''जयंतीच्या दिवशी देवदेवतांचे गुणगान करून कृतज्ञता व्यक्त करावी. आयुष्याचा भवसागर तरण्यास सद्‌गुरुकृपाच व्हावी लागते'' असे सांगून सद्‌गुरूंनी त्यांना नीलकांतीचे दर्शन कसे दिले, सद्‌गुरूंच्या कृपादृष्टीने वडिलांना झालेल्या बाधेचे निरसन कसे झाले हे अनुभव कथन केले. तसेच गुरुवाणी, अमृतकलश इत्यादी ग्रंथांचे आजच्या काळात असलेले महत्त्व विशद केले.

सौ. सुनंदा कुलकर्णी यांनी गुरुदेवांनी आपल्याकडून काव्य कसे करून घेतले याबाबतचा अनुभव सांगितला.

त्या म्हणाल्या की, ''गुरुदेवांचा वाढदिवस तारखेने १६ फेब्रुवारीला येतो. त्याच दिवशी दासनवमी पण होती. मुंबई सत्संगातर्फे श्रीराममंदिरात गुरुदेवांचा जयंती उत्सव साजरा होणार होता. त्यावेळी १५ फेब्रुवारीला मुंबई सत्संग मंडळाच्या अध्यक्षांना फोन करून अनुभव कथनाची परवानगी मागितली. तेव्हा ते उत्स्फूर्तपणे म्हणाले की, 'आपण काव्य करता का?' काव्य हा माझा प्रांत नसताना त्यांनी मला असे का विचारले ते कळले नाही.''

''दुसऱ्या दिवशी अवतरणिकेचे वाचन करीत असताना सतत मनात गुरुदेवांविषयी विचार येत होते. ते अनावर झाल्याने कागदावर लिहून काढले. त्यानंतर अवतरणिका वाचन पूर्ण केले. अवतरणिका वाचून झाल्यावर पाहिले तो माझ्याकडून गुरुदेवांनी काव्य करून घेतले होते.''

अनुभव कथनाचा कार्यक्रम झाल्यानंतर गुरुदेवांच्या आशीर्वादाच्या ध्वनिफीतीचे श्रवण उपस्थित भक्तांनी केले. यानंतर सद्‌गुरूंना सुवासिनींनी ७६ दिव्यांनी ओवाळून आरती केली. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

नित्याची माध्यान्ह आरती बरोबर ११.५५ वाजता श्रीदत्तक्षेत्रातील मंदिरात संपन्न झाली. सर्व गुरुभक्तांनी आरतीला उपस्थित राहून प्रसादभोजनाचा लाभ घेतला. दुसऱ्या सत्रात दुपारी ३ ते ४ या वेळेत 'श्रीरामराय माहात्म्य' पोथीचे सामुदायिक पठण करण्यात आले. दुपारी ४ ते ६ यावेळेत औरंगाबाद येथील सौ. क्षमा नांदेडकर व सहकलाकारांचा भक्तिगीतांचा कार्यक्रम झाला. अतिशय सुश्राव्य असा वैविध्यपूर्ण भक्तिगीतांचा कार्यक्रम उपस्थित भक्तांना भावून गेला.

भक्तांना भक्तीच्या उधाणात न्हाऊन काढणारा व डोळे दिपवणारा, कधी संपूच नये असे वाटणारा पालखी सोहळा!

विविधरंगी रेशमी गोंड्यांनी, आकर्षक पुष्पमालांनी मखमली वस्त्रे घातलेल्या व सजवलेल्या रजत पालखीमध्ये प. पू. सद्‌गुरूंची प्रतिमा व पादुका स्थापन केल्या होत्या. सद्‌गुरूंचे श्रीमुख अधिकच प्रसन्न दिसत होते. त्या प्रसन्न दर्शनाने गुरुदेवांची आठवण येऊन भक्तांचे डोळे नकळत अश्रूंनी भरून येत होते. ११ तोफांच्या सलामीने पालखीस सुरुवात झाली. पालखीने श्रीदत्त क्षेत्राभोवती तीन प्रदक्षिणा केल्या. प्रत्येक प्रदक्षिणेला चार दिशांना चार थांब्यांवर भक्तांनी गायनसेवा रुजू केली.

पालखी प्रदक्षिणेच्या पार्श्वभूमीवर मोकळ्या मैदानात आतषबाजी करण्यात आली.

### रामनवमी

चैत्र शुद्ध ९ म्हणजेच गुरुवार दिनांक २४ मार्च २०१० रोजी देवस्थानात श्रीरामनवमी साजरी झाली. पहाटे श्रीरामचंद्रांच्या गंडकी पाषाणाच्या मूर्तीवर पवमान अभिषेक करून षोडशोपचारे पूजा झाली. सकाळपासून श्री रामपंचायतन भाविकांना दर्शनासाठी गर्भगृहात ठेवण्यात आले होते. श्रीरामांना मोगऱ्याच्या पुष्पमालांनी व वस्त्रालंकारांनी सजवले होते. सुवासिक दवणा व तुळशी वहाण्यात आल्या होत्या. सकाळी ८ वाजता नगर पुरुष व महिला सत्संग मंडळातर्फे भजनसेवा सादर करण्यात आली. सकाळी ११.३० वाजता वेदमंत्रांच्या घोषात माध्यान्ह पूजेस प्रारंभ झाला. दुपारी १२ वाजता श्रीरामजन्म साजरा झाला. यावेळी 'बाळा जो जो रे, कुलभूषणा दशरथ नंदना, निद्रा करी बाळा..' हा पाळणा म्हणून बालरामांना जोजवले. आरतीनंतर सर्व भक्तांना सुंठवडा व कलिंगड प्रसादाचे वाटप झाले.

रात्री ८ ते ११ यावेळेत गीतरामायणाचा कार्यक्रम झाला. ठाणे येथील 'स्वरांजली' या संस्थेने हा कार्यक्रम श्रीरामाच्या चरणी सादर केला. श्री. सुरेश करमरकर, त्यांच्या सौभाग्यवती व साथीदार यांच्या मधुर गायनाने सर्व वातावरण राममय होऊन गेले. देवस्थानतर्फे त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

### हनुमान जयंती

चैत्र पौर्णिमा, दिनांक ३० मार्च २०१० रोजी तपोवनात श्री हनुमान जयंती साजरी झाली. विजय मारुतीची पहाटे षोडशोपचारे पूजा झाली. सूर्योदयाला आरती करून श्री हनुमान जयंती साजरी झाली. यावेळी उपस्थितांनी श्रीरामरक्षा व मारुती स्तोत्राचे पठण केले. पहाटे ५ वाजल्यापासून भक्तांनी तपोवनात दर्शनासाठी व जन्म सोहळा पहाण्यासाठी जमावयास सुरुवात केली.